| | |
|---|---|
| PWD (Public Works Department, Maharashtra) | ***अधीक्षक अभियंता, यांचे कार्यालय,*** **मुंबई (सा.बां.) मंडळ, मुंबई,** **२५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१.** |
| ई-मेल :- mumbai.se@mahapwd.com | दूरध्वनी - २२०७८८६३,२२०७८६३७ फॅक्स - २२०७८६२७. |
| जा.क्र.अअ(मुं)/परिमंडळ/का-७/भरती प्रक्रीया २०१८-२०१९/ ५१९२ | दिनांक :- ०६/०७/२०१९ |


**To,**


**Monika Dadasaheb Khedkar**
**At post Kapurwadi Tal Nagar 414002**
**PWDMB_JECGB_0022403**
**monikakhedkar813@gmail.com**


विषय :- कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट ब (अराजपत्रित) संवर्गातील राज्यस्तरीय सरळसेवेची रिक्त पदे भरणेबाबत.

१) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट ब (अराजपत्रित) या संवर्गातील राज्यस्तरीय एकुण ४०५ पदांसाठी प्रकल्प व्यवस्थापक, महापरिक्षा कक्ष, महा आयटी, मंत्रालय मुंबई यांचे मार्फत दिनांक १२.०२.२०१९ ते १५.०२.२०१९ रोजी राबविण्यात आलेल्या ऑनलाईन परिक्षेची गुणानुक्रमे यादी महापरिक्षा पोर्टल यांचेमार्फत या कार्यालयास प्राप्त झाली आहे.

२) प्राप्त निवडयादीच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या गुणवत्ता यादीत **SEBC** या कॅटेगरीच्या Cut- off इतकेच गुण आपणांस प्राप्त झाले असल्यामुळे समान गुण संदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या शासन सामान्य प्रशासन पूरक पत्र क्र.प्रानिमं-१२१७/(प्र.क्र.९२/१७)/१३ अ दिनांक ०२.१२.२०१७ मधील तरतुदीनुसार मुळ कागदपत्रे तपासणीकरिता आपण **"सभागृह, बांधकाम भवन इमारत, ७ वा मजला, २५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४०० ००१"** या ठिकाणी **दिनांक १०.०७.२०१९** रोजी **सकाळी १०.००** वाजता उपस्थित रहावे.

३) तसेच कागदपत्रे तपासणीसाठी येताना मूळ शैक्षणिक गुणवत्तेबाबतचे तसेच सामाजिक व समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असेल तर त्या कागदपत्रांची (खाली नमुद केल्याप्रमाणे) तसेच इतर आवश्यक त्या कागदपत्रांची ३ (तीन) छायांकित संच (साक्षांकनासह) या कार्यालयात समक्ष उपस्थित राहून सादर करावे.

- आवेदन पत्र (Application Form)
- भारतीय नागरीक व महाराष्ट्र राज्याचा अधिवास असलेले प्रमाणपत्र
- मागासप्रवर्गातून निवड झाली असल्यास उमेदवाराचे मूळ जात प्रमाणपत्र व जात वैद्यता प्रमाणपत्र.
- उमेदवाराचे शासन मान्य स्थापत्य अभियांत्रिकी पदविका प्रमाणपत्र, मार्क लिस्ट, (Diploma in civil Engineering)
- खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी असलेले आरक्षण- महिला व बालकल्याण विभाग शासन निर्णय क्र.८२/२००१/म.से.आ-२०००/प्र.क्र.४१५/का.२, दि.२२ मे २००१ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आरक्षणा अंतर्गत अर्ज करणाऱ्या महिला उमेदवारांनी वर्ष २०१७-२०१८ या कालावधी करिता वैध असलेले (अर्थात ३१/०३/२०१८ पर्यत वैध असलेले) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉनक्रिमीलेअर) मूळ प्रमाणपत्र.
- खेळाडूंसाठी असलेले समांतर आरक्षण, शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र.राक्रिधो-२००२/प्र.क्र. ६८/क्रीयुसे-२, दि.१ जुलै २०१६ मधील व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार राहील. तसेच क्रिडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील प्रमाणपत्र सादर करावेत.

PRINCIPAL
Dr. Vithalrao Vikhe Patil
College of Engineering
Ahmednagar

- महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम-२००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८) मधील कलम ४ (२) (दोन) खालील परंतुका अन्वये उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेयर) तत्व, विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड, विमाप्र व इमाव या प्रवर्गांना लागू करण्यात आलेले आहे. त्यानुसार शासन परिपत्रक सामाजिक न्याय व सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी.१०/२००६/प्र.क्र.१५/मावक-५, दि.३० जून २००६ सोबतच्या सुधारीत नमुन्यात उपरोक्त प्रवर्गातील उमेदवारांनी वर्ष २०१७-१८ या कालावधीकरीता वैध असलेले (अर्थात दि.१/४/२०१७ पासून अथवा तद्नंतर निर्गमित केलेले) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉनक्रिमिलेयर) मूळ प्रमाणपत्र.
- अनाथ मुलांसाठी असलेल्या राखीव पदासाठी महिला व बाल विकास विभागाकडून देण्यात येणारे अनाथ प्रमाणपत्र उमेदवाराने सादर करणे.
- अपंग (विकलांग) प्रवर्गातील उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक ०६/१०/२०१२ मधील आदेशानूसार विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करणे.
- महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये शासनाने गट अ, ब, क व ड मधील पदांच्या सेवा प्रवेशासाठी एक आवश्यक अर्हता म्हणून विहित नमुन्यातील लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र.
- शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज कार्यालय प्रमुखाच्या परवानगीने विहित मार्गाने सादर केलेल्या पत्राची प्रत व कागदपत्रे सादर करावीत.
- शेतकऱ्याचा पाल्य असलेल्या उमेदवाराने संबंधीत जिल्हास्तरीय समितीने उमेदवारास "कुटुंबातील मृत शेतकऱ्याचा पाल्य" म्हणून पात्र ठरविल्याबाबतचा पत्राचा क्रमांक व दिनांक असलेले मूळ प्रत.
- नमूद केलेले एक शासनमान्य मुळ ओळखपत्र व त्याची साक्षांकीत प्रत सोबत घेऊन येणे. (उदा. मतदान ओळखपत्र, आधारकार्ड, पॅन कार्ड, पासपोर्ट इत्यादी)

४) उक्त सर्व कागदपत्रांची पूर्ण पडताळणी तसेच संदर्भिय जाहिरातीतील नमूद सर्व निकषांची पूर्तता झाल्याशिवाय उमेदवारांना नियुक्तीपत्र देण्यात येणार नाही.

(एन.एम.पवार)
नोडल अधिकारी तथा,
**अधीक्षक अभियंता,**
**मुंबई (सा.बां.) मंडळ, मुंबई .**

प्रत :- उप सचिव,(आस्थापना) सा.बां.विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीकरीता सविनय सादर.

प्रत :- मा.मुख्य अभियंता, मुंबई सा.बां.प्रादेशिक विभाग,मुंबई यांना माहितीकरीता सविनय सादर.

DR. V.V. PATIL COLLEGE OF ENGINEERING Ahmednagar

PRINCIPAL
Dr. Vithalrao Vikhe Patil
College of Engineering
Ahmednagar